निधी वितरण सन २०२६-२०२७

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसाठी २२१० के ५४२ (General) या लेखाशिर्षाखाली १०-कंत्राटी सेवा अंतर्गत निधी वितरीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांकः मफुयो -२०२६/प्र.क्र.१६४/ई-१८६५८५४/MJPJAY&AB-PMJAY

गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला,

मंत्रालय, एल.टी. मार्ग, मुंबई

दिनांक: ०४ नोव्हेंबर, २०२६.

वाचा -

१. शासन निर्णय,उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस२०१४/प्रक्र.८२/भाग/ उद्योग-४ दि. १.१२.२०१६

२. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दि.२८ जुलै, २०२३

३. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. मफुयो -२०२५/ E- १०७६४९७/ MJPJAY&AB-PMJAY ,दि. १७ जुलै,२०२५

४. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. मफुयो -२०२५/ E- १०७६४९७/ MJPJAY&AB-PMJAY ,दि.१२.३.२०२६

५. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम दिनांक: ११/०८/२०२६

६. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. मफुयो -२०२५/ E- १०७६४९७/ MJPJAY&AB-PMJAY ,दि.२१.९.२०२६

७. राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई यांचे पत्र क्र.राआहसो/लेखा/वकाअ/१२३००/२०९७/२०२६ दि. २२.९.२०२६

८. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. मफुयो-२०२६/प्रक्र. १६४/E-१८६५८५४/ MJPJAY&AB-PMJAY ,दि.१६.१०.२०२६

प्रस्तावना :-

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भ क्र. ८ येथील दिनांक १६.१०.२०२६ च्या शासन निर्णयानुसार रु. ३५,५४,१९,९०५/- (रुपये पस्तीस कोटी चौपन्न लाख एकोणीस हजार नऊशे पाच फक्त) इतका निधी अंमलबजावणी सहाय्य संस्थेची माहे एप्रिल २०२६ ते जून २०२६ या कालावधीतील देयके अदा करण्यासाठी वितरित करण्यात आला होता. तथापि वित्त विभागाने संदर्भ क्र. ५ येथील दि. ११/०८/२०२६ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकारी नियम पुस्तिका १९७८, भाग १, उपविभाग एक ते पाच अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा केली आहे तसेच यापूर्वी निर्गमित केलेले वित्तीय अधिकार प्रदानाचे आदेश निष्प्रभावी केले आहेत. यास्तव संदर्भ क्र. ८ येथील दि.१६.१०.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ मध्ये सुधारित वित्तीय अधिकार प्राधिकाराचा उल्लेख करून शासन शुद्धीपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन शुध्दीपत्रक-

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक मफुयो-२०२६/प्र.क्र.१६४/ई १८६५८५४ /MJPJAY&AB-PMJAY दि. १६.१०.२०२६ मधील परिच्छेद क्र. ३ "वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक: विअप्र २०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग २ दि. १७/०४/२०१५ चे परिशिष्ठ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उपविभाग चार खर्चाच्या संकीर्ण बाबी संबंधी प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार अ.क्र. ११ नुसार बाहय यंत्रणेकडून करुन घेण्यात येणाऱ्या कामाचा खर्च मंजूर करण्याचे अधिकार प्रशासनिक विभागाला आहेत. तसेच देयक प्रदान करताना प्रदान नियमानुसार सर्व शासकीय वजावटी करण्यात यावेत. संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद केलेले दर रु ६४.५४ अधिक GST असे ग्राहय धरण्यात यावेत." याऐवजी

"वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक: विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम भाग १ दि. ११/०८/२०२६ चे परिशिष्ठ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उपविभाग चार खर्चाच्या संकीर्ण बाबी संबंधी प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार अ.क्र. ११ नुसार बाह्य यंत्रणेकडून करून घेण्यात येणाऱ्या कामाचा खर्च मंजूर करण्याचे अधिकार प्रशासनिक विभागाला आहेत. तसेच देयक प्रदान करताना प्रदान नियमानुसार सर्व शासकीय वजावटी करण्यात याव्यात. संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद केलेले दर रु. ६४.५४ अधिक GST असे ग्राह्य धरण्यात यावेत." असे वाचण्यात यावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६११०४११२४४४४६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL VITHALRAO SAWARE

Digitally signed by ANIL VITHALRAO SAWARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=073348B7A8767F0F7865422DF1E65CE2F3BCDF6786E4712E2C088A9AC4FFEE3F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1C7875BFBCCDB94828A5028954F06ED28EC75FD43053DB3AE8254FA5A5D14A57, cn=ANIL VITHALRAO SAWARE
Date: 2026.11.04 12:03:46 +05'30'

(अनिल सावरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई.
६. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
७. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
८. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई. (३प्रती)
९. नियोजन विभाग (कार्यासन१४७२), मंत्रालय, मुंबई.
१०. वित्त विभाग, कार्यासन - व्यय -१३/अर्थसंकल्प-९, मंत्रालय, मुंबई-३२.
११. अर्थसंकल्प शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई..
12 निवड नस्ती. (MJPJAY&AB-PMJAY).